उपक्रम

# ‘‘कृषी पर्यटनातून निसर्गाशी पुन्हा नाते जोडता येईल’’

## ‘बसवंत कृषी पर्यटन महोत्सवा’त आदिनाथ चव्हाण यांचे प्रतिपादन



**बसवंत संकुलात आयोजित ‘कृषी पर्यटनातून शाश्वत ग्रामविकास’ या परिसंवादाचा दीपप्रज्वलनाने शुभारंभ झाला. यावेळी व्यासपीठावर उपस्थित श्री. मनोज हाडवळे, श्रीमती मधुमती सरदेसाई– राठोड, डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार, श्री. आदिनाथ चव्हाण, श्री. संजय पवार, श्री. चंद्रशेखर भडसावळे, डॉ.श्री. भास्कर गायकवाड, श्री. संदीप वाघ, श्री. संदीप सोनवणे, श्री. नितीन कराळे.**

**आ**जकालच्या धावपळीच्या अर्थकेंद्री दिनचर्येमुळे शहरी माणसाचे निसर्गाशी पूर्वापार असलेले नाते तुटत चालले आहे. हे नाते पुन्हा जोडायचे असेल तर कृषी पर्यटन केंद्रांना पर्याय नाही. मात्र हा सृष्टिस्नेही संकल्प यशस्वी करण्यासाठी अशा केंद्रांच्या परिसरातील उपलब्ध सुविधांचे उत्तम नियोजन, स्वच्छता आणि सेवासातत्य आवश्यक आहे, असा अभिप्राय ‘अ‍ॅग्रोवन’ या प्रख्यात कृषी दैनिकाचे संपादक संचालक **श्री. आदिनाथ चव्हाण** यांनी व्यक्त केला.




‘पूर्वा केमटेक’ आणि ‘ग्रीनझोन अ‍ॅग्रोकेम’ आयोजित बसवंत पर्यटन महोत्सव तसेच आंबा महोत्सवाचे उदघाटन नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव (ब.) येथे त्यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच परिसरातील गोल्फ कोर्टसह गेम झोनचा शुभारंभही यावेळी करण्यात आला. या अनुषंगाने आयोजिलेल्या ‘कृषी पर्यटनातून शाश्वत ग्रामविकास’ या राज्यस्तरीय परिसंवादात प्रमुख पाहुणे या नात्याने ते बोलत होते.

आपल्या विवेचनात ते पुढे म्हणाले की, निसर्ग संवर्धनाला पूरक बाबींचा ध्यास ठेवणे सर्वंकष प्रगतीचा मार्ग दाखवेल. अशा स्वतंत्र पर्यटन केंद्रांच्या उभारणी बरोबरच विदेशी प्रकल्पांच्या धर्तीवर या क्षेत्रात देखील संयुक्त ‘क्लस्टर बेस’ अधिक लाभदायक ठरेल. साचेबंद व्यावसायिक दृष्टीच्या पलीकडे जाऊन, बसवंत मधमाशी पालन प्रशिक्षण केंद्रासारखा वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प यशस्वी करणारे ‘पूर्वा केमटेक’चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांचा त्यांनी गौरवपूर्ण निर्देश केला. नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत येथील बसवंत गार्डन

संकुलात मागील महिन्यात गुरुवार, दि. १२ मे रोजी हा कार्यक्रम झाला.

यावेळी **श्री. संजय पवार** यांनी येथील विविध



वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांची माहिती दिली. शहरी तसेच ग्रामीण नागरिकांना कृषी पर्यटनाच्या माध्यमातून निसर्गसमृद्ध जीवनशैलीचा अनुभव मिळवून देणे; हा या उपक्रमाचा हेतू असल्याचे त्यांनी नमूद केले. याद्वारे केवळ शेतीवर अवलंबून असलेल्या कृषिवल समूहाला अर्थार्जनाचा एक नवा स्रोत उपलब्ध होईल, अशी धारणा असल्याचे त्यांनी सांगितले. सृष्टिसंवर्धन, पीकवृद्धी आणि मधासह इतर बहुमोल उत्पादने मानवाला देणाऱ्या मधमाशीचे महत्त्व सांगून, बसवंत मधमाशी पालन केंद्रातील अद्ययावत प्रशिक्षण सुविधांचा तपशीलही सांगितला. त्याचप्रमाणे या संयुक्त उपक्रमाचा भाग असलेले; बसवंत संकुलातील ग्रामविकासाचे मॉडेल म्हणून उभारलेले आदर्श गाव सेवरगांव, मधमाश्यांना अनुकूल ठरणारी- हंगामानुरूप पीक लागवडीच्या आराखड्याची मिनिएचर प्रतिकृती, याद्वारे साध्य होणार असलेली कृषी उत्पादन वृद्धी, फळप्रक्रिया केंद्र यांसह जानोरी फ्लॉवर्स सारख्या अन्य प्रकल्पांचा सविस्तर तपशीलही त्यांनी सांगितला.

चर्चासत्राच्या प्रमुख पाहुण्या नाशिक विभागाच्या पर्यटन उपसंचालक **श्रीमती मधुमती सरदेसाई- राठोड** यांनी



कृषी पर्यटन विकासाच्या दृष्टीने असलेल्या शासनाच्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. या संदर्भात राज्यात २०२० पासून सर्वसमावेशक धोरण जाहीर झाले आहे; यातील लाभदायी योजनांच्या पात्रतेसाठी असणारे निर्धारित निकषही त्यांनी समजावून सांगितले. देश- विदेशातील पर्यटकांना आकर्षित करता येणे, हेच यातील यशाचे गमक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



रायगड जिल्ह्यातील नेरळस्थित 'सगुणा बागे'चे संचालक **श्री. चंद्रशेखर भडसावळे** आणि पुणे जिल्ह्यातील राजुरी- जुन्नर येथील 'पराशर कृषी पर्यटन केंद्रा'चे संचालक **श्री. मनोज हाडवळे** हेही कार्यक्रमाचे विशेष निमंत्रित होते. त्यांनी आपापल्या प्रकल्पांची वैशिष्ट्ये दृकश्राव्य ध्वनिफितींद्वारे रंजक शैलीत सांगितली. उपस्थितांनी त्यांच्या निवेदनाला मनःपूर्वक दाद दिली. निमंत्रित वक्त्यांनी पॉवर पॉईंट डिस्प्लेच्या माध्यमातून मुद्देसूद मांडणी केल्यामुळे या परिसंवादाला नेटके स्वरूप आले होते.

'पूर्वा' परिवाराचे मार्गदर्शक तथा ज्येष्ठ कृषितज्ज्ञ डॉ. बी.बी. पवार, 'ग्रीनझोन' चे टेक्निकल डायरेक्टर व 'पूर्वा कृषिदूत' मासिकाचे संपादक **डॉ. भास्कर गायकवाड**



यांसह अन्य मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. डॉ. गायकवाड यांनी प्रारंभी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. तसेच समारोपादाखल केलेल्या भाषणात दिवसभरातील विचारमंथनाचा गोषवारा मांडून या परिसंवादाचे हेतुकथनही केले. शेती व्यवसायाच्या आजच्या अनिश्चित परिस्थितीत कृषी पर्यटन ग्रामीण अर्थव्यवस्थेला नक्कीच उभारी देईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. अशी केंद्रे निवासी स्वरूपात उभी राहिल्यास ती एकाकी ज्येष्ठ नागरिकांचे आनंदी निवासस्थान ठरू शकतील, याकडे देखील त्यांनी लक्ष वेधले. कृषी क्षेत्रासह पर्यटन व्यवसायाबद्दल आस्था असलेल्या श्रोत्यांच्या भरगच्च उपस्थितीत या चर्चासत्राचा समारोप झाला. बसवंत केंद्राच्या वतीने सायली लभडे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

■



'बसवंत आंबा महोत्सवा'चे उद्घाटन करताना श्री. आदिनाथ चव्हाण. समवेत श्री. चंद्रशेखर भडसावळे, श्री. संजय पवार, डॉ.श्री. भास्कर गायकवाड, डॉ. बी.बी. तथा श्री. अण्णासाहेब पवार यांसह 'पूर्वा'- 'ग्रीनझोन' परिवारातील सहयोगी.

# मंगेश साळवी आणि भारतीबेन पटेल 'मिलांज आंबा महाराजा'चे मानकरी




**पूर्वा** केमटेक प्रा.लि. आणि ग्रीनझोन ॲग्रोकेम प्रा.लि. च्या सहयोगाने आयोजित, बसवंत कृषी पर्यटन महोत्सवांर्गत बसवंत गार्डन, मुखेड रोड, पिंपळगाव (ब), नाशिक येथे आंबा महोत्सव स्पर्धा- प्रदर्शन तसेच चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. आंबा स्पर्धेत हापूस आंबा गटात मंगेश साळवी (गोळप, ता.जि. रत्नागिरी) तर केशर आंबा गटात भारतीबेन पटेल (बिनवाडा, ता. वलसाड, जि. वलसाड) हे 'मिलांज आंबा महाराजा' पुरस्काराचे मानकरी ठरले.

या आंबा स्पर्धेतील पारितोषिकप्राप्त सहभागींची फळांच्या जातींनुसार नावे खालीलप्रमाणे-

हापूस आंबा गट **प्रथम** : कुणाल आर. शिंदे, शिरगाव, ता.जि. रत्नागिरी. **द्वितीय** : सुनिल वारिसे, गोळप, ता. जि. रत्नागिरी आणि **तृतीय** : स्वप्नील बाणे, वाडा, ता. देवगड, जि. सिंधदुर्ग.

केशर आंबा गट **प्रथम** : ब्रिजेशभाई पटेल, कलवाडा, ता. वलसाड, जि. वलसाड. **द्वितीय** : महेशभाई पटेल, खजुर्डी, ता. वलसाड, जि. वलसाड आणि **तृतीय** : दीपकभाई पटेल, कलवाडा, ता.जि. वलसाड.

त्याचप्रमाणे वसंत कचरू आहेर (आंबा : वनराज), मुखेड, ता. येवला, जि. नाशिक. ब्रिजेशभाई पटेल (आंबा : दशहरी), वलसाड, गुजरात. किरण पटेल (आंबा : लंगडा), वलसाड, गुजरात. वसंत कचरू आहेर (आंबा : बदाम), मुखेड, ता. येवला जि. नाशिक आणि शुभम मुळे (आंबा : केशर) फणसावळे, ता. जि. रत्नागिरी या पाच जणांना **उत्तेजनार्थ** पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

महाराष्ट्र तसेच गुजरात राज्यातील दीडशेहून अधिक आंबा उत्पादक शेतकऱ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविल्याची माहिती 'पूर्वा केमटेक'चे कार्यकारी संचालक श्री. संजय पवार यांनी दिली. विविध १५ जातींच्या आंब्यांचे गुणवत्तेनुसार परीक्षण 'ग्रीनझोन ॲग्रोकेम'चे टेक्निकल डायरेक्टर डॉ.श्री. भास्कर गायकवाड व 'पूर्वा केमटेक'चे तज्ञ अधिकारी श्री. दिलीप जगताप यांनी केले. ■

# चित्रकला स्पर्धेचे पारितोषिक वितरण

**कृ**षी पर्यटन महोत्सवात घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धेतील गटनिहाय विजेते पुढीलप्रमाणे–

इ. ५ वी ते ७ वी गट : प्रथम– भूमी सुनील पवार, द्वितीय– ओजस्वी किशोर देवरे, तृतीय– प्रज्ञा अनिल सोनवणे. उत्तेजनार्थ : मुक्ता मोहन घाटे, सलोनी अनिल मुरेकर, अनुष्का शशांक गांगुर्डे.

इ. ८ वी ते १० वी गट : प्रथम– श्रावणी नीलेश गवांदे, द्वितीय– बुशरा अनिस शेख, तृतीय– वैशाली त्र्यंबक धुळे. उत्तेजनार्थ : पूजा शिवदास चौधरी, गायत्री दिलीप सावंत, अर्चित सारंग पाटील.

खुला गट : प्रथम– जगदीश दत्तात्रय कुशारे, द्वितीय: स्वाती सारंग पाटील, तृतीय– संजना विनोद यादव. उत्तेजनार्थ: मानश्री अविनाश अहिरे, यशराज कैलाशसिंग परदेशी, संजय बाबूराव मोते.

चित्रकला स्पर्धेचे बक्षीस वितरण श्री. धनंजय सावलकर यांच्या हस्ते करण्यात आले. ■



**बसवंत संकुलात आयोजित चित्रकला स्पर्धेतील विजेत्यांना गौरवताना श्री. संजय पवार, श्री. धनंजय सावलकर, श्रीमती मधुमती सरदेसाई– राठोड. समवेत श्री. नितीन कराळे, श्री. संदीप वाघ, डॉ.श्री. अण्णासाहेब पवार, श्री. संदीप सोनवणे.**